जा.क्र.मकृखोविम- सिंव्य-१/१६/( ४८८/१८)/१९०७ / २०१९

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ
पुणे-११.
दिनांक : १०/०४/२०१९

प्रति,

मुख्य अभियंता
जसं जलसंपदा
पुणे

**विषय:-** पुणे महानगर पालिकेच्या जलसंपदा विभागासोबत केलेला बिगर सिंचन करारनामा नुतनीकरण करणे साठी सहा महिनेची मुदतवाढ बाबत

**संदर्भ:-** १) मुख्य अभियंता पाणी पुरवठा विभाग पुणे महानगरपालिका पुणे यांचे पत्र जाक्र. ११३०५ दि.२८/०२/२०१९
२) मुख्यअभियंता, जसं पुणे यांचे पत्र क्र. मुअ/जसं/प्रशा-८/ १५७० दिनांक ०३/०४/२०१९

वरीलविषयी संदर्भिय पत्र क्र.१ अन्वये पुणे महानगरपालिके सोबतचा पाणी पुरवठ्याचा करारनामा दिनांक २८/०२/२०१९ रोजी संपुष्टात येत असल्यामुळे मुख्य अभियंता मनपा पुणे यांनी पाणी वापर अंदाजपत्रक (Water Budget) जललेखा परिक्षण (Water Audit) याबाबींची प्रक्रिया पुर्णकरणेसाठी अधीक्षक अभियंता पुणे पाटबंधारे मंडळ पुणे यांच्या कडे पुढील सहा महिनेची मुदत मागितली आहे. या प्रकरणी मुख्य अभियंता जसं पुणे यांनी अधीक्षक अभियंता यांच्या शिफारशीवरुन या कार्यालयाकडे मुदत वाढ देण्याची विनंती केली आहे.

वरील पार्श्वभुमीवर पुणे शहराच्या पिण्याच्या पाणी पुरवठयाचा महत्वाचा विषय व उन्हाळ्यातील पिण्यच्या पाण्याचे महत्व या बाबींचा विचार करता प्रचलित करारातील अटी व शर्ती कायम ठेवुन पुणे महानगरपालिकेच्या पाणी पुरवठ्याचा करारनामा नुतनीकरण करण्याची मुदत खालील अटींच्या अधीन राहुन दिनांक ३१/०८/२०१९ पर्यंत वाढवुन देण्याच्या प्रस्तावास मान्यता कळविण्यात येत आहे.

१.महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधीकरणाचे आदेश क्र.( ईग्रजी) No MWRRA/२०१८/Legal/Case No १४ (२०१८)/९२९ दिनांक १७/१२/२०१८ मधील अ.क्र २९ (Xiii)चे तंतोतंत अनुपालन होईल याची दक्षता घ्यावी.त्याच प्रमाणे थकबाकी भरणे बंधनकारक आहे.

२.मुदतवाढीच्या कालावधीमधे पुणे महानगर पालिकेने पाण्याचा वापर करारपत्रातील मर्यादेत करावा.व अनधिकृत पाणी वापरासह पाणीव्यय (Losses) प्रतिबंधक ठोस उपाययोजना करावी.

३. दिनांक ३१/०८/२०१९ पुर्वी पुणे महानगर पालिकेने ,नवीन करारनामा करणे करिता पाणी वापर अंदाजपत्रक (Water Budget) वस्तुनिष्ठ वर्षनिहाय लोकसंख्येनुसार व पाणी वापराच्या मापदंडानुसार अचुक करावे.तसेच शासन निर्णय सम्किर्ण-२०१८/(५११/१८) सिंव्य(धो) दिनांक ०१/१२/२०१८ मधील तरतुदींचे अनुपालन करावे व आवश्यक त्या शर्ती करारनाम्यात समाविष्ठ कराव्यात.

४. सिंचन व बिगर सिंचन पाण्याचा वापर अचुक नोंदविण्यासाठी पाणी विसर्ग मोजणीची अद्ययावत उपकरणे वापरावीत.

वरील प्रमाणे कार्यवाही करुन अहवाल सादर करावा.

कार्यकारी अभियंता
मकृखोविम पुणे

स्वाक्षरित मा. का.सं. यांच्या स्वाक्षरित असे

प्रत : अधीक्षकअभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ पुणे, यांना माहिती व कार्यवाहीसाठी.